ॐ श्री परमात्मने नमः।

अथ एकादशोऽध्यायः।

विश्वरूपदर्शन योग (अध्याय ११ वा)

श्लोकसंख्या - ५५ अनुष्टुप - १९ त्रिष्टुप - ३६

अर्जुन ३२, भगवंत - १४, संजय - ९

११ उवाच

या अध्यायाला तीर्थस्थानाचे पावित्र्य आहे. या अध्यायात शांत, अद्भुत, रौद्र भयानक इ० रसांचा आविष्कार आहे. मागील अध्यायात शांत रस होता. इथे शांत रसाच्या घरी अद्भुत रस पाहुणा आला आहे. या अध्यायात साक्षात्काराचे विवेचन आहे. ∴ या अध्यायाला अध्यात्मिकदृष्ट्या विशेष महत्व आहे. मागील अध्यायात ज्या अक्षरतत्वाचे निरूपण भगवंत करीत आले, त्याचे प्रत्यक्ष दर्शन इथे घडवले आहे. परमात्मदर्शनाची भव्यता, सुंदरता, उग्रता, तेजस्विता येथे दाखवली आहेच परंतु समग्र परमात्मा व्याकुळ करतो, नकोसा करतो असे विलक्षण दृश्य या अध्यायात दिसते. या अध्यायात भगवंत कमी बोलतात. अर्जुनच जास्त करून आपली अनुभूती स्पष्ट करीत आहे. या अध्यायात त्याच्या श्रद्धेला ईश्वरनिष्ठेचे स्वरूप प्राप्त होते आणि अशा ईश्वरनिष्ठांचा समूह निर्माण व्हावा हीच गीताध्ययनाची दृष्टी आहे. ईश्वरनिष्ठांची मांदियाळी।

ईश्वर पहावा, देव दिसावा हे वाटणे सोपे पण "त्याचे समग्र दर्शन हे मानवी शक्तीच्या आकलनाच्या पलीकडे आहे" असा साक्षात्कार या अध्यायाच्या अभ्यासाने होतो.

www.madhaveeraghuveer.com

Notes

| S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | MAY |

विभूतियोगात भगवंतांनी सांगितले की, हे सर्व जगत मी एका अंशमात्राने धारण केले आहे. जेव्हा एका अंशाने अनंत विभूती धारण करणाऱ्या भगवंतांचे समग्र ऐश्वर्य कसे असेल या कल्पनेने तो घाबरून गेला. आणि भगवंतांनी आपल्या अविनाशी स्वरूपाचे दर्शन द्यावे अशी नम्र विनंती त्याने केली. आणि भगवंतांनी ते तत्काळ मान्यही केले. अर्जुनरूपी चातकावर तो मेघ होऊन बरसला, बरसला. भगवंतांचे समग्र (दर्शन) ऐश्वर्य अर्जुनाच्या चर्मचक्षुंना दिसणे शक्यच नव्हते. म्हणून भगवंतांनी त्याला दिव्य चक्षु प्रदान केले. अत्यंत प्रकाशमान, सीमारहित, विराटस्वरूप भगवंतांनी स्वतःला आपल्या ऐश्वर्यासह प्रगट केले. अर्जुन थरारला, आश्चर्यचकित झाला, हर्षाने रोमांचित झाला, भ्याला. जणू अनंत रसांचे दर्शन त्याला एकाच वेळी झाले. त्याचे रौद्र स्वरूप पाहून तो भांबावला. घाबरला. डोळे झाकून घेऊ लागला. शेवटी त्याने हे विराट स्वरूप आवरून नेहमीचे चतुर्भुज रूप धारण करावे म्हणून तो विनवू लागला. अर्जुनाच्या दिव्य चक्षुंना हे ऐश्वर्याचे, दिव्यतेचे विश्वदर्शन भगवंतांनी घडवले म्हणून या अध्यायाचे 'विश्वरूपदर्शनयोग' हे नाव सार्थ आहे.

दहावा अध्याय एका दृष्टीने क्रमयोग आहे. भगवंतांच्या विभूती मागील अध्यायात सांगितल्या.

Notes

| 2011 | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| APR | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

मिमांसा, जिज्ञासा, मुमुक्षा, मुमुक्षता
जिज्ञासा - Curiosity

Imp. आत्मिक जिज्ञासा

त्या विभूती किती असू शकतात. त्यांची व्यापकता किती प्रचंड आहे हे या अध्यायात जाणवते. मुंगीपासून ~~ब्रह्म~~ब्रह्मदेवापर्यंत तो सर्वत्र सामावला आहे हे समजते. पण त्याच्याही पलीकडे हे व्यक्तिमत्त्व व्यापक आहे. विभूतियोगामध्ये हे दर्शन अंशात्मक आहे. परंतु या सर्व शक्ती प्रकट करणारा त्यांच्या मागचा जो कर्ता आहे त्यामागचे जे चैतन्य आहे. त्या चैतन्यतत्त्वाची व्याप्ती, शक्ती, तेज, वैभव ऐश्वर्य किती असेल याची उत्सुकता अर्जुनाच्या ठायी निर्माण होते आणि तो समग्र विश्वरूप-दर्शनाची इच्छा करतो. त्याच्या ठिकाणी जिज्ञासा निर्माण होते. शुद्ध जिज्ञासा पारमार्थिक आत्मोन्नतीला कारणीभूत ठरते. आणि भौतिक जिज्ञासा ही विज्ञानाकडे जायला प्रवृत्त करते.

अर्जुनाच्या ठिकाणी अशी शुद्ध जिज्ञासा जागृत झाली. आणि आता कदाचित भगवंताची कृपा झाली तर विश्वरूपदर्शन घडेल या जाणिवेने तृप्तीने, अत्यानंदाने, किंवा ब्रह्मानंदात रममाण झाल्यामुळे अर्जुनाकडून एक लहानसा प्रमाद घडला आणि या अध्यायाच्या पहिल्या श्लोकातील पहिल्या चरणात तो आठच्या ऐवजी नऊ अक्षरे बोलून गेला. Excitement मुळे असे घडले परंतु असे झाल्यामुळे छंदाचा भंग झाल्याचे जाणवत नाही.

Notes

| S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | MAY |

चैतन्यतत्व -

अवतार
ब्रह्मदेवादि
कारक
पार्षद
महात्मा
उत्तम
मध्यम
कनिष्ठ

हा क्रम नीट ध्यानात घेतला तर हा अध्याय समजेल. कनिष्ठ, मध्यम उत्तम, महात्मा, पार्षद (जयविजय) कारक-(व्यास, पतंजली, शंकराचार्य) देव (ब्रह्मदेव इ.) अवतार (श्रीकृष्ण, श्रीराम) हे जर थोडे उमगले तर त्या पलीकडचे चैतन्यतत्व समजेल.

काही विभूती पाहून अर्जुनाचे समाधान झालेले नाही. तो आता म्हणतो मला सगळी गुह्य उघडून दाखव. मला हे सगळे वैभव पहायचे आहे. कितीही पाहिले तरी त्याची तृप्ती होत नाही. परमार्थ विषय असा आहे की कितीही वेळा सेवन केला तरी तृप्ती होत नाही. माणसाची अधिक जिज्ञासा पारमार्थिक असावी म्हणजे लोककल्याणाचा हेतू त्यामध्ये अधिक असावा.

(९) या अध्यायात शांत आणि अद्भुत रसांनी भरलेली कथा आहे. जणू विष्णू व शंकर हे (एका) येण्यातले देव एकमेकांना भेटायला यावेत. अमावस्येच्या दिवशी सूर्यबिंब व चंद्रबिंब समोरासमोर यावेत. ज्याप्रमाणे

Notes

| 2011 | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| APR | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

www.madhavaveeraghuveer.com

भूतानां भव च अप्ययः च मया विस्तरशः श्रुतौ
हे कमलपत्राक्ष त्वत्तः श्रुतौ
च अव्ययं माहात्म्यमपि श्रुतम्।



प्रयाग क्षेत्रात गंगा व यमुनांचा संगम व्हावा तसा दोन रसांचा मिलाफ झाला आहे. अकरावा अध्याय मोक्ष स्पष्ट करणारा आहे.

अर्जुन म्हणाला- माझ्यावर अनुग्रह करण्यासाठी अध्यात्म नावाचे अत्यंत गुह्य शास्त्र तू बोललास त्याने माझा मोह संपूर्णपणे नाहीसा झाला.

अध्यात्मसंज्ञित - आत्म्याचे अमरत्व, परा, अपरा प्रकृती आणि आत्मज्ञान.

परम - भगवंतांचे प्रत्येक वचन सद्वस्तु प्रगटविणारे.
गुह्य - कोणी अनधिकारी त्या वचनाला धारण करू शकत नाही.

म्हणून विषयासक्त व मलिन बुद्धीच्या अनधिकारी व्यक्तीला गोपनीय राजविद्या सांगू नये. भगवंतांनी ५ व्या ते १० व्या अध्यायापर्यंत तत् पदाचा अर्थ उलगडला त्यामुळे अर्जुनाचे भगवत्स्वरूपाविषयीचे अज्ञान दूर झाले आणि मोहही गेला.

(२) भूतांची उत्पत्ती (भव) व प्रलय (अप्यय) आपल्याकडून विस्तारपूर्वक ऐकली व आपला प्रभावही ऐकला

परमात्मा चराचराचे बीज
अविनाशी
कर्ता असूनही अकर्ता
} या सर्वांचे ज्ञान अर्जुनाला झाले.

कमलपत्राक्ष - कोमलहृदय भगवंत पाण्यात असून अलिप्त.

Notes

SUNDAY 1

Labour Day (KE)

| S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | MAY |

(३) अर्जुनाच्या विनंतीत सख्यभक्ती आहे. आत्मभाव आणि जिव्हाळा आहे.

"तू या विश्वात भरला आहेस, हे पूर्णपणे माझ्या या डोळ्यांनी दिसावे. आपले ज्ञान, ऐश्वर्य, शक्ती, बल, वीर्य आणि तेजयुक्त रूप प्रत्यक्ष पहाण्याची मला इच्छा आहे." नत पद्याच्या श्रवणाने अर्जुन दिपून गेला होता. नत पदाच्या वर्णनाचा

(५-६) अहं कृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयस्तथा - प्रारंभ
(१०.४२) एकांशेन स्थितो जगत् उपसंहार.

(४) ईश्वर उदार आहे तो भक्तपारखी आहे. अर्जुन भगवंतांची स्तुती करताना त्यांच्या अभिवचनाचीच आठवण करून देतो आहे. ८-२२ आणि १०-१०,११
अर्जुन मोठा चतुर आहे. या श्लोकात त्याने योगेश्वर म्हटले आहे. कारण योगमायेवर त्यांचे स्वामित्व आहे.

अर्जुन म्हणतो - हे विश्वरूप दर्शन घेण्यास मी पात्र आहे असे तुला वाटत असेल तरच तू मला दाखव.

अर्जुनाने जन्मजन्मांतरी अशी तपश्चर्या केली आहे म्हणून तो या पायरीला येऊन पोहोचला. तो म्हणतो - भगवंता, माझ्या ठायी हे सामर्थ्य आहे की नाही ते आपणच ठरवा आणि विश्वरूप दर्शनास मी पात्र असेन तर मला ते घडवा असे अर्जुनाने विनम्रतेने म्हटले. त्यावर भगवंत प्रसन्न होऊन म्हणतात - माझी हजारो रूपे पहा.

Notes

गुरुला देखील चांगला शिष्य भेटला की अत्यानंद होतो.
रामकृष्ण परमहंस - विवेकानंद
समर्थ रामदासस्वामी - कल्याण
निवृत्तिनाथ ज्ञानेश्वर माऊली
नम्रतेमुळे (विनयामुळे) सर्व साध्य होते.

| 2011 | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| MAY | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

www.madhavbhaveeraghuveer.com

(५) या सृष्टीतील अनंत जन नाना प्रकारांनी त्या विराटस्वरूप परमात्म्याची उपासना करतात.
इथे या परमात्म्याचे मस्तक अग्नी, चंद्र व सूर्य हे नेत्र, दिशा या कान, वाणी हेच वेद, वायु हा प्राण आणि पृथ्वी हे पाय आहेत. परमात्मा सर्व

बहुरत्नानि वसुंधरा - सर्व विश्व परमात्म्यात सामावले आहे. रोडकी, लठ्ठ, ठेंगू, उंच, प्रशस्त, विस्तृत, सडपातळ, प्रामाणिक, सक्रिय, निष्क्रिय, उदासीन, प्रेमळ, कडक, धुंद, सावध, मदोन्मत्त, उदार, कृपण, निराश, आशावादी, स्नेहाळ त्याचप्रमाणे शेंदरी, केशरी, शुभ्र, सोनेरी, निळी, काळी, पिवळी, हिरवी ही आणि अशी नाना प्रकारची रूपे मायेच आहेत.

Trailex

(६) अशी प्रस्तावना करून भगवंत काय काय दाखवणार आहेत ते थोडक्यात सांगतात.
आदितीचे बारा पुत्र (आदित्य) आठ वसु, अकरा रुद्र, एकोणपन्नास मरुद्गण, दोन अश्विनीकुमार यांना पहा. शिवाय यापूर्वी न पाहिलेली आश्चर्यकारक रूपे पहा. अश्विनद्वय या वेदाच्या काळापासून पूज्यात देवता आहेत. एकाच नावाने ओळखण्यात येणारे हे देवतायुग्म आहे. हे जुळे भाऊ असून त्यांची जोडी अभंग आहे. अश्विन म्हणजे अश्वयुक्त. त्यांचा रथ अश्वयुक्त असून सोनेरी रंगाचा आहे. हे अश्विनौ अत्यंत तेजस्वी, रूपसुंदर, सामर्थ्यवान आहेत.

*Notes*

| W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | JUN |

हे देवांचे धन्वंतरी आहेत. व्याधीमुक्त करणारे दिव्य चिकित्सक म्हणून त्यांचा गौरव आढळतो. स्त्रियांना अपत्यप्राप्ती, नपुंसकाला पौरुष प्राप्त करून देण्याचे दैवी सामर्थ्य यांच्या ठायी आहे. ते भक्तांचा अकाली मृत्यु टाळतात.

जरखड म्हातारा झालेल्या च्यवनाला पुन्हा तारुण्य प्राप्त करून दिले. ते अभाग्याला भाग्य आंधळ्याला दृष्टी, दुबळ्याला शक्ती भुकेल्याला अन्न देतात. आर्त व्याधीग्रस्तांची पीडा दूर करून भक्तांना सुखी करतात. यांची स्तुती व ध्यान केल्याने उत्तम फळ लाभते.

(७) निद्रेवर विजय प्राप्त केला तो गुडाकेश होय. अशा सजग अर्जुनासाठी भगवंत विश्वरूप प्रगट करणार आहेत. इथे अद्य म्हणजे या शुभ प्रसंगी होय. अर्जुनाला चराचर सृष्टी अनंत ब्रह्मांडा-सहित पहावयास मिळणार आहेच पण याशिवाय आणखीही जे काही पहावयाची इच्छा आहे ते सर्व पहा असे भगवंत म्हणतात. त्यामध्ये ब्रह्मांडाचे रहस्य, त्याचे उपादान व निमित्त कारण, परिवर्तन, कुरुक्षेत्रावरील जय-पराजय असे अनेक विषय आहेत. मात्र हे भव्य, दिव्य व प्रखर रूप पाहणे प्राकृत चक्षुंना शक्य नाही. त्यासाठी दिव्य दृष्टीच हवी. ∴ भगवंत दिव्य दृष्टी प्रदान करतात.

*Notes*

www.madhaveeraghuveer.com

| 2011 | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| MAY | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

(८) ज्यामुळे भगवंतांचा प्रभाव व योगसामर्थ्य पहाता येईल असे अलौकिक चक्षु भगवंत देऊ करतात. दिव्य दृष्टी व दूरदर्शन या आपल्या परंपरेत सिद्धी मानल्या आहेत. 'माझे ऐश्वर्य पहा' याचा अर्थ भगवंतांच्या समष्टि इच्छेत (Cosmic will) तुझी व्यष्टी इच्छा (Individual will) समर्पित केलीस म्हणजे दिव्य दृष्टी प्राप्त होते. ऐश्वर्य बघ असे म्हणून अर्जुनाची उत्सुकता वाढवली आणि नंतर त्याला दिव्यदृष्टी दिली.

दिव्य दृष्टी - आणि स्थूल सृष्टीकडून आत सूक्ष्म अशा अंतरंगातील ईशतत्त्वाकडे जाणे म्हणजे प्राकृत चक्षुकडून प्रज्ञाचक्षुकडे जाणे.

IMP श्रुतप्रज्ञा - वेदांच्या शब्दापासून झालेले ज्ञान.
अनुमानप्रज्ञा - अनुमानप्रमाणाने जे ज्ञान होते ते.
या दोहोंच्या योगाने होणाऱ्या सामान्य ज्ञानापेक्षा ऋतंभरा प्रज्ञेचा विषय भिन्न असतो Universal

ऋतंभरा प्रज्ञा म्हणजे साक्षात ईश्वरी तत्त्वाला धारण करणारी प्रज्ञा होय. या प्रज्ञेनेच ईश्वराचे समग्र दर्शन होते.

आता यानंतर भगवंतांनी आपले दिव्य रूप अर्जुनाला कसे दाखवले हे पुढील पाच श्लोकात संजय सांगत आहे.

Notes

| W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | • | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | • | JUN |

www.madhaveeraghuveer.com

(९) इथे संजय धृतराष्ट्राला राजन् म्हणून संबोधतात.
हरिः - सर्व पापांच्या नाश करणारे
योगेश्वर - भगवंत मायेचे अधीश्वर आहेत. माया ही सदैव भगवंतांशी युक्त असते म्हणूनच तिला योगमाया म्हणतात.

भगवंत जेव्हा माझे ऐश्वर्य पहा असे म्हणतात तेव्हा भगवंतांचे वचन म्हणजे केवळ ऐश्वर्य नसून ब्रह्मसाम्राज्याला प्रकाशित करणाऱ्या ज्ञानरूपी ज्योतीच होत.

संजय धृतराष्ट्राला राजन म्हणतो. भावार्थ असा की हे राजा तू तुझ्या राज्याचा राजा असशील, पण भगवंत अनंत ब्रह्मांडाचे, विश्वाचे स्वामी आहेत.

दर्शयामास - आमन्त परोक्षभूतकाळ याचा प्रयोग केवळ १० वा गण किंवा प्रयोजक धातूसाठी - (य).

(१०) (११) परमात्म्याचे अद्भुत स्वरूप - विश्वरूपाची सर्व अंगे अर्जुनाने पाहिली. सर्व विश्वरूपमय आहे असे त्याला दिसले. त्याने डोळे बंद केले तरीही आत - सुद्धा त्याला तसेच विश्वरूप दिसू लागले. अर्जुनाचे पाहणे किंवा न पाहणे हे भगवंतांनी व्यापून टाकले.

हे दिव्य विश्वरूपदर्शन फक्त अर्जुन व संजय यांनाच घडले. संजय हा विद्याभ्यासी व महर्षितुल्य होता. स्थळ, काळ, कार्यकारणभाव यांच्या अतीत झाल्या - शिवाय हा अनुभव येणार नाही.

श्रवण, मनन, निदिध्यास आणि आत्मसाक्षात्कार

Notes

| 2011 | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| MAY | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

www.madhaveeraghuveer.com

या चार पायऱ्या क्रमाक्रमाने गेल्यास भगवंताचे दर्शन आत्मसाक्षात्कारामध्ये घडते. चैतन्यस्वरूपामध्ये जीवात्मा त्या परब्रह्मामध्ये मिसळतो. या सर्व स्थूल पायऱ्या आहेत. मात्र श्रवण ही दिव्य दृष्टीसाठी पहिली पायरी आहे.

श्रवणे घडे उपरती । बद्धाचे मुमुक्षु होती ।
मुमुक्षाचे साधक अती । नेमेसि चालती ॥
साधकाचे होती सिद्ध । अंगी बाणला प्रबोध ।
हे तो आहे प्रसिद्ध । सकळास ठाउके ॥

वक्ता व श्रोता दोघेही अध्यात्मप्रवण, शुची, श्रद्धायुक्त व आत्मोध्दारासहित विश्वकल्याणाची इच्छा धरणारे हवेत. वक्त्यासाठी श्रोते परमेश्वरच असतात.

श्रोते ऐकती आदरे । तरी बोलेन बोलडी उत्तरे ।
स्वामी तुमच्याने आधारे । होईन निरभिमान ॥

श्रवणानंतर मनन आवश्यक आहे. एकांतात विवेक उमगतो. यत्न सापडतो आणि परमेश्वराचे स्मरण करण्याची बुध्दी बळावते. अन्न खाल्ल्यावर जसे पचणे आवश्यक आहे तसे श्रवणानंतर मनन आवश्यक आहे. त्यामध्ये अंतःकरण चतुष्टय जिंकून वासना आवराव्या लागतात. मग निदिध्यास लागतो. हळूहळू व्यक्तीच्या साऱ्या अशुभवासना नष्ट होतात. शुभ वासनांचा उगम मननाच्या दुसऱ्या पायरीवर होतो. त्यानंतर शुक्ल कृष्ण दोन्ही कर्मे जातात. केवळ लोकसंग्रहासाठी कर्मे करावी लागतील. आणि पूर्ण आत्मसाक्षात्कार होण्यासाठी ज्ञानाच्या सात पायऱ्यांवरून जावे लागते –

www.madhaveeraghuveer.com

Notes

SUNDAY 8

| W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | JUN |

१. शुभेच्छा - विषयसुख जर दोषयुक्त असेल तर दोषरहित सुख कोणते ते शास्त्र व सज्जनांद्वारे समजून घेऊ आणि खऱ्या आणि श्रेष्ठ सुखप्राप्तीस लागू या. Better late than never.

२. विचारणा - मनुष्य शास्त्राचे परिशीलन व सज्जनांचा सहवास मोठ्या आदराने करू लागतो. साधनेचे प्रत्यक्ष अनुष्ठान करू लागतो. चित्तातील सत्त्वगुण वृद्धिंगत होऊ लागतो.

३. तनुमानसा - अध्यात्मग्रंथ अभ्यासण्यामागे कोणत्याही फळाची अपेक्षा नसून खरोखरच गोडी लागते व वाढू लागते. प्रापंचिक गोष्टींविषयी बोलण्यात गोडी वाटत नाही. मोक्षमार्गाचे श्रवण करताना अंतःकरण सद्गदित होते, डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागतात आणि सगळ्या शरीरावर रोमांच उभे रहातात.

४. सत्त्वापत्ती - शास्त्र व गुरु सांगतात ते पूर्णपणे खरे आहे अशी मनाची निश्चिती होईपर्यंत ते सुरू ठेवणे आणि मी देहाहून भिन्न आहे; सच्चिदानंदरूप आहे हे प्रमेय मनाला निःसंदेहपणे पटेपर्यंत मनन चालू ठेवणे. शास्त्रप्रचीती, गुरुप्रचीती याच्या जोडीला आत्मप्रचीतीची म्हणजे स्वानुभवाची जोड मिळावी.

Notes

www.madhaveeraghuveer.com

| 2011 | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| MAY | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

805 126 0036

ILywI

५. असंसक्ती - या पायरीवर आल्यावर योग्याच्या ठिकाणी सिद्धी प्रकट होतात. परंतु त्या सिद्धींच्या आधीन न होता पुढे वाटचाल करावी लागते.

अणिमा - अत्यंत सूक्ष्मपणा आणण्याचे सामर्थ्य

लघिमा - अत्यंत हलके होणे.

महिमा - इच्छेनुसार विशाल होणे

प्राप्ती - इच्छेनुसार हवी ती वस्तू प्राप्त होणे.

प्राकाश्य - परलोकातील वा ऐहिक अदृश्य विषयाचे ज्ञान.

ईशिता - विश्वातील सर्व व्यापारांवर स्वामित्व

वशिता - चराचर सृष्टी वश करून घेण्याची शक्ती

प्राकाम्य - आप्तकाम व पूर्णकाम होणे.

या आठ महासिद्धी आहेत. याव्यतिरिक्त तुकाराम महाराजांनी सांगितलेल्या अष्टमहासिद्धी - अजरामरत्व, गरिमा, आकाशगमन, सिद्धदर्शन परकायाप्रवेश, दूरदर्शन, त्रिकालज्ञानसिद्धी व भूतजन्म स्मरणासिद्धी

मात्र कोणताही योगी या सिद्धींना भुलत नाही. जे योगी स्वार्थासाठी वा इंद्रियसुखासाठी या सिद्धींचा उपयोग करतात ते अधःपतित होतात.

६. पदार्थभाविनी - जीवनमुक्तीतील स्वप्नतुल्य अवस्था! स्वप्नात काहीतरी भास असतो म्हणून ती झोप नव्हे आणि बाह्य जगताचे भान नसते म्हणून जागृती नव्हे. अशा स्थितीला पदार्थभाविनी या स्थितीवर येऊन पोहोचलेल्या योग्याची होते.

Notes

| W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | JUN |

५. तुर्यगा - ही सातवी ज्ञानभूमी होय. तुर्यगा म्हणजे सुषुप्तावस्था! ही स्वसंवेदरूप शांतिमय अवस्था आहे.

या सर्व विवेचनाचे सार असे की, आत्मसाक्षात्काराच्या अत्युच्च भूमिकेवर आरूढ झालेल्या महात्म्यालाच ईश्वराचे समग्रदर्शन घडू शकते. अर्जुन अशा भूमिकेवर आरूढ झालेला नाही. तथापि भगवान श्रीकृष्णांच्या कृपेने अर्जुनाला अशा अत्युच्च भूमिकेवरून भगवंतांचे समग्रदर्शन घडते.

(१२) एकाच वेळी हजारो सूर्य आकाशात उगवले तर त्यांचे जितके तेज होईल तितके कदाचित या परमात्म्याच्या प्रभेची बरोबरी करू शकेल. तो लख्ख प्रकाशाचा लोक होता.

अणुबाँबची निर्मिती ज्याने केली तो प्रख्यात शास्त्रज्ञ ओपेनहॅमर त्याला अणुस्फोटानंतर हाच श्लोक उद्धृत करावासा वाटला.

अणुच्या आत सुद्धा प्रचंड विश्व आहे त्यात विलक्षण सामर्थ्य आहे, चैतन्य आहे. जडामध्ये चैतन्य असतेच. स्थूलामध्ये सूक्ष्म आहेच.

ज्ञानदेवांनी अचेतन भिंत चालवली. भिंतीच्या, मातीच्या, दगडाच्या प्रत्येक कणामध्ये चैतन्य होतेच. मात्र ते दहा दिशांना विखुरलेले होते. ते त्यांनी केवळ एका दिशेला वळवले आणि ती भिंत चालायला

Notes

www.madhavveeraghuveer.com

लागली चांगदेवांना सामोरी गेली. चांगदेवांचे गर्वहरण झाले. ज्ञानेश्वरांनी आपले योगिक सामर्थ्य अवघे चैतन्यतत्त्व एका दिसेला वळवून हा चमत्कार केला. भगवंताचे हे अवघे ऐश्वर्य आणि रूप पाहून अर्जुन थक्क झाला.

(१३) अर्जुनाने त्यावेळी अनेक प्रकारे विभागलेले संपूर्ण जगत त्या देवाधिदेव श्रीकृष्णाच्या शरीरात एकत्रित असलेले पाहिले.

Uniformity in Variety.

नामरूपात्मक भेदांनी वरवर भिन्न वाटणारे पण अंततः एकरूप असणारे विश्वरूप पाहिले.

(१४) या विश्वरूप दर्शनाने अर्जुनाच्या शरीरावर मस्तकापासून पायापर्यंत रोमांच उभे राहिले. भगवंताचे असे अलौकिक दर्शन झाल्यावर अर्जुनाचे अष्टसात्त्विक भाव जागृत झाले. अत्यानंदाने तो हर्षनिर्भर झाला. भगवंताच्या दिव्यत्वाचा, ऐश्वर्याचा अनुभव घेऊन थरारलेला अर्जुन अत्यंत विनम्र होऊन वंदन करता झाला.

(१५) हे देवा, तुझ्या शरीरात सर्व देवांना तसेच अनेक भूतांचे समुदायाला, कमळाच्या आसनावर बसलेल्या ब्रह्मदेवाला तसेच महादेवाला व सर्व ऋषींना

www.madhavideraghuveer.com

Notes

8.00 त्याचप्रमाणे दिव्य सर्वांना मी पाहतो आहे
हे विराट स्वरूप सर्वसमावेशक आहे. त्या
9.00 स्वरूपात सर्व देव (ज्ञान ऊर्जेची अनेक केंद्रे)
पंचमहाभूतांचे अनेक समुदाय (अनेक ग्रह, तारे)
10.00 सत्यलोकात रहाणारा ब्रह्मदेव (विश्वात्मक मनाचे
काल्पनिक साकार रूप) महादेव (संहार शक्ती)
11.00 [विष्णु (विश्वप्रतिपालक शक्ती) गीतेत नाही परंतु
ज्ञानेश्वरीत आहे] म्हणजे एकाच परमेश्वराची
12.00 निर्माण - प्रतिपालन - संहार अशी तीन स्वरूपात
शक्ती दृग्गोचर होते हे त्याला सुस्पष्ट दिसते.
1.00 विश्‌ म्हणजे व्यापणे - सर्व व्यापक असा तो विष्णु
ज्यांच्या ठिकाणी ज्ञान व कर्म ही एकत्र येतात
2.00 त्यांना ऋषी म्हणतात. यस्य वाक्यं स ऋषिः।
ज्याचे वाक्य (मंत्र) तो ऋषी. (निरुक्त - ७.९५)
3.00 देवः दानात् वा दीपनात् वा द्योतनात् वा।
द्युस्थानो भवतीति वा। यो देवः सा देवता॥
4.00 अर्थात दान देणे, चकाकणे, प्रकाश देणे अशा अर्थाच्या
दा, दीप किंवा द्युत या धातूपासून देव हा शब्द
5.00 बनला आहे. द्युलोकात रहाणारे ते देव होत.
उप + आस = बसणे या धातूपासून उपासना हा शब्द
6.00 सिद्ध झाला आहे. आपल्या इष्टदेवतेजवळ जाणे किंवा
त्या देवतेशी तद्रूप होणे हा उपासनेचा अर्थ आहे.
7.00 उपासनेचा सर्वश्रेष्ठ विषय ईश्वर वा परब्रह्म होय.
दिग्‌ सर्प - गतिसूचक हे विराट चैतन्य अनेक दिव्य

Notes

| 2011 | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| MAY | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

www.madhaveeraghuveer.com

प्रवाहांनी युक्त आहे. सागरातही शीत-उष्ण असे अनेक आणि इतरही अंतर्गत प्रवाह आहेत.

शरीरातील विद्युतशक्ती कुंडलिनी ही सर्पाकृतीत दिसते. ती प्रकाशझरी वाहत आल्याप्रमाणे दिसते. साडेतीन वेटोळी असलेली ही तेजाची नागिणच आहे. या शरीरातील कुंडलिनीप्रमाणे विश्वव्यापक कुंडलिनी असते. तिच्या तेजोमय गतीचे हे वर्णन आहे जे पिंडी ते ब्रह्मांडी.

[अनंत, वासुकी, तक्षक, कर्कोटक, पद्म, महापद्म शंख व कुलिक हे आठ प्रधान सर्प आहेत.]

(१६) हे संपूर्ण विश्वाचे स्वामी, आपल्याला अनेक हात, अनेक उदरे अनेक मुखे, अनेक नेत्र असून आपण अनेक रूपांनी नटलेले आहात.

अनंत रुपे अनंत वेष देखिले म्या त्यासी आपणास आदि, मध्य किंवा अंत असे काहीही नाही हेही मला प्रत्यक्ष दिसत आहे. हे सर्व विश्व म्हणजे त्या चैतन्याचीच रूपे आहेत हे दिसू लागतात विश्वातील सारे हात, सारी उदरे, सारी मुखे, नेत्र हे त्याचेच आहेत हे जाणवते. हा चैतन्याचा सागर उसळता, उचंबळता आहे. सागर लाटांवर फेस यावा तसे विश्व निर्माण होते आणि बुडबुडे फुटावेत तसे ते विलीनही होते. ही प्रक्रिया अखंडपणे चालू आहे. हा चैतन्याचा सागर केव्हापासून उचंबळतो आहे

Notes

SUNDAY 15

| W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | JUN |

www.madhaveeraghuveer.com

हे सांगता येत नाही. त्यामुळे विश्व नाही अशी स्थिती केव्हाच नसते. बुडबुडे फुटतात नि नवे निर्माण होतात पण बुडबुडे असतातच. त्यामुळे याला सुरुवात नाही, शेवट नाही त्यामुळे मध्यही नाहीच. परंतु या निराकाराला ही कधीकधी आकार येतो. या तेजोरूपात एक आकृती असल्याचा भास होतो. चंद्रावर, समुद्रावर, निळ्या आकाशातही काही आश्चर्यकारक दर्शने होतात. ही दर्शने म्हणजे आपल्या प्रतिभेने त्या निराकाराला आलेले आकार होत.

(१७) किरीटयुक्त, गदा-चक्रयुक्त असा सर्व बाजूंनी प्रकाशमान तेजाचा पुंज प्रज्वलित अग्नी व सूर्याप्रमाणे कांतिमान डोळे दीपवणारा, व्याप्तीला आणि कांतीला पार नसलेला असा तू मला जिकडे तिकडे दिसते आहेस.

अर्जुनाने भगवंतांची विराट मूर्तीच पाहिली. ते दर्शन त्याला सर्वत्र होत होते. तो तोंड फिरवून उभा राहिला तरी त्याला ते दिसत होते. इतकेच नाही तर त्याने मिटून डोळे मिटले तरी ते दर्शन होतच होते. अर्जुनाचे पाहणे व न पाहणे हे या साक्षात्काराने मिळून टाकले. अप्रमेय म्हणजे हा या प्रकारचा आहे असे निश्चितपणे सांगता न येणे. मोजता न येण्यासारखे (मा - मेय - प्रमेय - अप्रमेय)

*Notes*

दीप्त → अर्क → द्युति

प्रज्वलित अग्नी → सूर्याप्रमाणे कांतिमान → डोळे दीपवणारे

अप्रमेय - व्याप्तीला व कांतीला पार नसलेला.

| 2011 | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| MAY | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

www.madhaveeraghuveer.com

किरीट - ब्रह्मलोक
प्रचंड शक्तिरूप ऊर्जा - गदा
स्वतःचे परिवर्तनशीलता - चक्र
प्रत्येक प्राणाकृती - [illegible]
[illegible] - [illegible]

दुर्निरीक्ष्य - प्राकृत डोळ्यांना न दिसणारे.
ब्रह्मलोक हा किरीट आहे. परमात्म्याची प्रचंड शक्तिरूप ऊर्जा म्हणजे गदा आहे.

(१८) या विराट दर्शनाने तो भांबावून गेला. अरे! ज्याला परमात्मा म्हणतात ते हेच स्वरूप की काय? हे अपूर्व दर्शन पाहून तो म्हणाला- भगवंता! ज्याचे ज्ञान करून घ्यावे असे ते आपणच परम अक्षर आहात. आपणच या विश्वाचे परम आश्रयस्थान आहात. आपणच शाश्वत धर्माचे रक्षक आहात. आपणच सनातन अविनाशी पुरुष आहात.

परम अक्षर- सर्वश्रेष्ठ अक्षर तत्त्व याला दुसरा शब्द 'प्राण' आहे. प्राण म्हणजे तालयुक्त स्पंदन किंवा गती. सारी सृष्टी स्पंदनाचा परिणामच आहे. वृक्ष, पाषाण, पशु, पक्षी, मानव यात हे स्पंदन आहेच. म्हणून ते परम अक्षर आहे. आणि त्याचसाठी म्हटले जाते- परमात्मा सर्वत्र आहे.

प्रत्येक वस्तु अणु-परमाणुरूप मानली जाते. अणुचे अंतरंग कमालीच्या गतीमान विद्युत कणांचे आहे हे सिद्ध झालेले आहे. तेव्हा वस्तुजाताचे अंतर्स्वरूप हे स्पंदनात्मक आहे.

आजचे विज्ञान आणि भारतीय तत्त्वज्ञान यात एक मुद्दा मतभेदाचा आहे. भारतीय तत्त्वज्ञान सांगते की स्पंदनात्मक तत्त्वात जाणीव आहे. या जाणीवेस

Notes

| W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | JUN |

www.madhaveeraghukeer.com

मानसतत्त्व म्हटले आहे याला विश्वव्यापक मन
Cosmic Mind म्हणता येईल. अव्यय, सनातन-
चिरंतन टिकणारे. पुरुष-आत्मा (स्फुरणात्मक
अक्षरतत्त्व) शाश्वत धर्म- विश्वव्यापक नियमबद्धता
किंवा ऋत. जो नियम एका ठिकाणी सापडतो
तो सर्वत्र तसाच असणार. छोट्या प्रयोगशाळेत
नियम शोधतात व तो नियम विश्वव्यापक
सिद्धांत म्हणून वापरतात. झाडावरचे फळ खाली
पडले त्यावरून गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत स्थापन
झाला. या शाश्वत धर्माचा भंग कोणालाही
करता येत नाही. इथे हिंदु, मुस्लीम, शीख
किंवा बौद्ध हा धर्म अपेक्षित नसून वैज्ञानिक
सिद्धांत हा अर्थ अभिप्रेत आहे.

धर्मो विश्वस्य जगतः प्रतिष्ठा।

Law is the foundation of the Universe!

साऱ्या विश्वाचे पायाभूत तत्त्व 'धर्म'
म्हणजे नियमबद्धता हे आहे.

(१९) हे भगवंता, तू आदि, मध्य अंतरहित आहेस.
तुझे सामर्थ्य अनंत आहे तुझे बाहु अनंत आहेत.
चंद्र सूर्य तुझे नेत्र आहेत. तुझे मुख म्हणजे प्रदीप्त
अग्नी आहे. तू आपल्या तेजाने या विश्वाला
प्रकाशित करत आहेस असा तुला मी पहात आहे.

☸ एका काल्पनिक बिंदूतून अनंत मलिन रेषा

Notes

| 2011 | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| MAY | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

www.madhaveerguruveer.com

छेदून जातात. तसे तुझे अनंत बाहू म्हणजे अनंत दिशा आहेत - तुझी कार्यशक्ती प्रचंड आहे.

परमात्म्याचे मुख म्हणजे प्रदीप्त अग्नी. सारे विश्व त्या परमात्म्याचा प्रकाश आहे. म्हणूनच त्याची स्तोत्रे म्हणताना त्वं अग्निः, त्वं रुद्रः त्वं सूर्यः त्वं चन्द्रमा असे म्हणतात.

परमात्म्याच्या प्रकाशाचे तीन स्तर

१. अचेतन: जडता - अति मंदता
२. सचेतन सृष्टी - जड व चेतन यांची कमी-अधिक प्रमाणात मिश्रणे.
३. केवळ चैतन्य - जडतेचा लोप, केवळ प्रकाश वीजेचा लखलखाट व्हावा त्याप्रमाणे हे चैतन्याचे दर्शन झाले तर ते कसे दिसेल!

(२०) स्वर्ग पृथ्वी आणि मधले अंतर तू एकट्यानेच व्यापून टाकले आहेस. सर्व दिशाही तूच व्यापून टाकल्या आहेस. तुझे हे अद्भुत दर्शन अत्यंत उग्र आहे. त्यामुळे तिन्ही लोक व्यथित झाले आहेत.

अंतर म्हणजे आकाश ते शून्य किंवा रिते वाटते परंतु वास्तविक ते तसे नाही.

वटबीज फोडून पाहिले तर त्यात काही नसते परंतु तेच बीज रुजले की त्यातून फांद्या, पाने आणि पारंब्यांनी युक्त असा विशाल वृक्ष तयार होतो. जे काही नाही वाटते, तिथेच विस्ताराचे सूक्ष्म स्वरूप असते.

www.madhuveeraghuveer.com

Notes

| W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | JUN |

म्हणून चैतन्यशून्य असे काहीच नाही. परंतु ते केवळ चैतन्य प्रकट झाले तर ते सहन होणार नाही. वीजेच्या लोळ प्रकट झाल्याप्रमाणे होईल. अग्नीत काही टाकले की ते अग्निरूपच होते. म्हणून ते पाहणे शक्य नाही.

द्यौ हे केवळ मेघाद्वारे स्मित करते. हे वीजेचे रूपक आहे. द्यौ पिता आणि पृथ्वी माता असल्याचे उल्लेख ऋग्वेदात आहेत. हा पृथ्वी सुपीक करणारा आणि गरजणारा वृषभ आहे.

द्यौ हा शब्द दिव धातुपासून आला आहे. त्याचा अर्थ प्रकाशमान असा आहे.

पृथ्वी हा शब्द प्रथ धातुपासून आला आहे. त्याचा अर्थ वाढणे, पसरणे असा आहे.

या सर्वांना भगवंताने व्यापले आहे म्हणून भगवंत हा महिमामय आहे.

(२२) अश्विनीकुमार – आरोग्यदेवता
वायु – प्राण व गती देवता
पितर – परंपरा देवता
गंधर्व – स्वर व लय देवता
यक्ष – जलदेवता
असुर – कलादेवता

परमात्मा जर प्रकट झाला तर तो उग्र व विश्व प्रलय करणारा असतो त्याच्या दर्शनाने (सर्वजण)

Notes भयचकित होतात.

www.madhaveelaghuveer.com

| 2011 | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| MAY | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

(२२) जे हे अकरा रुद्र व बारा आदित्य तसेच आठ वसु आणि साध्यगण विश्वेदेव तसेच अश्विनीकुमार व मरुद्‌गण आणि पितरांचा समुदाय व गंधर्व यक्ष राक्षस आणि सिद्धगण यांचे समुदाय आहेत ते सर्वच विस्मित होऊन आपल्याकडे पहात आहेत.

<u>उष्मप</u> - हा पितरांचाच एक प्रकार असून प्रत्येक महिन्याच्या शुद्ध प्रतिपदेला त्यांची आराधना करतात. उष्ण म्हणजे गरम अन्नसेवन करणारे ते उष्मप होय. कव्यवाह, अनल, सोम, यम, अर्यमा, अग्निष्वात्त व बर्हिषत् हे सात उष्मप पितर आहेत.

<u>साध्यदेव</u> - तामस मन्वंतरातील देवगणांना साध्यदेव म्हणतात. <u>विश्वेदेव</u> - ऋग्वेदातील एका यज्ञीय देवसमूहाला विश्वेदेव म्हणतात. विश्वेदेव म्हणजे सर्व देव असा अर्थ होतो.

धार्मिक कार्याच्या अखेरीस मंत्रपुष्पांजली म्हटली जाते. त्यातील आविक्षित कामप्री या राजांच्या यज्ञात विश्वेदेव हे यज्ञीय सभासद असल्याचा उल्लेख आहे.

<u>असुर</u> - दितीचे पुत्र दैत्य आणि दनुचे पुत्र दानव या दोघांनाही असुर म्हणतात. हे देवांचे शत्रू आहेत. असूने म्हणजे प्राणाने त्यांना उत्पन्न केले म्हणून ते असुर!

(२३)(२४)(२५) ऊरु - मांड्या. तुझे हे भयानक रूप पाहून सर्व लोक (सप्त स्वर्ग, सप्त पाताळ) व्याकुळ झाले आहेत. माझीही तीच अवस्था झाली आहे. मला धैर्यही राहिले

www.madhaveeraghuveer.com

Notes

SUNDAY 22

| 2011 | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JUN | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

नाही आणि मनाला शांतीही नाही.

तुझ्या विक्राळ दाढांची व प्रलयाग्नीसारखी प्रज्वलित तोंडे पाहून मला दिशाही समजत नाहीत. सारे सुख करपून गेले आहे. हे देवाधिदेवा, जगन्निवासा, प्रसन्न व्हा.

समग्र परमात्मा प्रकट होणे म्हणजे समग्र विश्वाचे चिद्रूपात रूपांतर होणे. इथे तर सारे विश्वच उर्जस्वल दिसत होते. त्यामुळे कशाचेच अस्तित्व रहाणार नाही या जाणिवेने सर्व लोक भयभीत झाले. अर्जुनाचे धैर्य गळून पडले. तो शत्रूला घाबरत नव्हता. आपण आपल्या सामर्थ्याने नक्की जिंकू असा विश्वास त्याला वाटत होता. पण इथे मात्र आपले सामर्थ्य क्षुद्रातिक्षुद्र ठरेल अशी त्याला भीती वाटत होती. आगीत कवठ टाकले तर ते जसे तडकून फुटते तसे अहंकाराचे कवच तडकून फुटले. या स्वरूप-प्रलयात आपल्या अहंकाराला - अस्तित्वाला काही किंमत नाही असे त्याला वाटले. मीपणाची धुंदी पार ओसरली. जीवनाला काही अर्थ उरला नाही. सुखही संपले, शांतीही गेली. जीवनाला अर्थशून्य करणारे हे विराट दर्शन भयभीत करणारे वाटले. हे दर्शन इतके सर्व बाजूंनी, सर्व दिशांनी एकाएकी प्रगट झाले की अर्जुनाला दिशाही समजेनाशा झाल्या म्हणून तो प्रार्थना करतो आहे.

www.madhaveeraghuveer.com

Notes

| 2011 | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| MAY | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

(२६) (२७) या श्लोकामध्ये शब्दचित्र हा अलंकार दिसून येतो. परिस्थितीचे अत्यंत वास्तववादी वर्णन यात केले आहे. हे वर्णन वाचून विराटरूपाच्या भव्यतेची यथार्थ जाणीव आपल्याला होते. (स्वभावोक्ती)

धृतराष्ट्राचे सर्व पुत्र, राजांचे समुदाय, भीष्म द्रोण, कर्ण, पांडवांकडील योद्धे हे सगळेजण परमात्म्याच्या विक्राळ मुखात वेगाने जाताना व नाश पावताना अर्जुनाने पाहिले. हा विश्वरूपाचा प्रकार अद्भुत आहे. हा प्रत्यक्ष पेटलेला वाराच आहे त्याला आवरता कसे येईल? विजाने भरलेले आकाश कोणाला कसे गिळता येईल? महाकाळाबरोबर खेळता येईल का?

(२८) (२९) वीर योद्ध्यांना नद्यांची व पतंगाची उपमा दिली आहे. पांडव - नद्या - आत्मसमर्पणाची भावना
कौरव - पतंग - आत्मनाश

(३०) या लपलपणाऱ्या ज्वाळांनी आपण चहूकडून चाटत आहात. आपला उग्र प्रकाश संपूर्ण जगताला तेजाने परिपूर्ण भरून तापवीत आहे. कृपा करून आता या उग्ररूपाला वाढवू नका. देवा आपल्या स्वतःच्या अंगी असलेले भगवंतपण आठवा. नाहीतर तसे करण्याची इच्छा नसेल तर निदान माझ्यापुरती तरी कृपा करा.

किती वाढविसी या उग्र रूपा। अंगीचे भगवंतपण आठवी बापा॥
नाही तरी कृपा। मजपुरती पाही॥ ११.४४३

Notes

| W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | JUN |

www.madhaveeraghuveer.com

(31) एवढे उग्र रूपधारी आपण आहात तरी कोण? मी आपणास प्रणिपात करतो. आपण प्रसन्न व्हा. आपण आदिस्वरूप आहात; परंतु आपले हे स्वरूप उग्र का आहे ते तरी सांगा. हे भयानक रूप मला दाखवण्याचा आपला हेतू तरी काय आहे? मला काहीच समजेनासे झाले आहे.

जीवात्म्याला परमात्म्याच्या समग्र रूपाची प्रचीती येणे शक्य नाही. म्हणून येथे अर्जुन 'न हि प्रजानामि' असे म्हणतो आहे.

(32)(33) लोकांचा विनाश करणारा काळ मीच आहे. या सर्वांचा नाश करण्यासाठीच मी प्रवृत्त झालो आहे. जे योद्धे आपल्या किंवा प्रतिपक्षाच्या सेनाविभागात उपस्थित आहेत ते सर्व लोक काळाच्या कराल दाढेखाली सापडलेले आहेत. जिथे सृष्टी आहे तिथे संहारही आहेच. आणि तो उग्र भयंकर वाटणारच. प्रत्येक वस्तूचे विभाजन, विघटन अटळच आहे. कारण काळ म्हणजे गती आहे. सारे योद्धे आपापल्या कर्मांनी मरणारच आहेत. 'मी त्यांना मारणारा आहे' असा अहंकार तुला असण्याचे कारणच नाही. तू असलास किंवा नसलास तरी हे विश्व चालणारच आहे. ते परमात्म्याच्या इच्छेने किंवा सामर्थ्याने चालते. ती विश्वचालक शक्ती सारे कर्म करीत असते. कठपुतळी चालवणारा कलाकार पडद्यामागे उभा असतो. साऱ्यांच्या दोऱ्या त्याच्या हातात

Notes

| 2011 | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| MAY | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

www.madhaveeraghuveer.com

असतात. त्या सैनिकांचे धागे तुटलेले आहेत. ते प्राणहीन झालेले आहेत. कोणीही ढकलले तरी ते उलथून पडतील. ते श्रेय तू मिळव आणि युद्ध कर. शत्रूंना जिंकून पृथ्वीचे समृद्ध राज्य तू उपभोग. तुझा जय निश्चीत आहे. तू यश मिळवशील.

हा विश्वचालक तुझ्या हातून कार्य करत आहे. हे तू अनुभव. मात्र अहंशून्य झालास तरच त्याचा तुला अनुभव येईल. आणि तुला कळेल की तू केवळ निमित्तमात्र आहेस. तुझा अहंकार या परमात्मस्वरूपात तादात्म्य पावू दे. म्हणजे तुझ्यातून विश्वशक्तीच कार्यरत आहे असे तू अनुभवशील. इथे अर्जुनाच्या पराक्रमाची आठवण करून देण्यासाठी त्याला वापरलेले संबोधन आहे - सव्यसाचिन. सव्य म्हणजे डावा. दोन्ही हातांनी अचूक शरसंधान करणारा तो सव्यसाचिन.

तुझ्या सर्व चिंतनातील केंद्रबिंदू 'मी मी' आहे. हा मी जर परमात्म्यात विलीन झाला तर स्थल कालही संपतात. अहंकार हा स्थलकालातच कार्य करतो. अहंकार संपताच कर्मांना विश्वव्यापक गतीचे स्वरूप प्राप्त होते. या विश्वगतीशी म्हणजेच शाश्वत धर्माशी आपले कर्म सुसंगत असावे एवढाच विचार उरतो. परमात्मा शाश्वत धर्माचे पालन (रक्षण) करणारा आहे - शाश्वतधर्मगोप्ता. [गुप् - रक्षण करणे.] आपला स्वधर्मही शाश्वत धर्माशी सुसंगत हवा, विसंगत नको - समाजघातकी कृत्य नको.

आपण जेव्हा सत्कर्म (धर्मानुकूल वर्तन) करतो तेव्हा

Notes

ही विश्वचालक शक्ती आपल्या पाठीशी असते. तिचा आशिर्वाद आपल्याला मिळतो. मात्र जेव्हा कोणतेही दुष्कृत्य घडते तेव्हा हीच शक्ती आपल्याविरुद्ध उभी असते. त्यामुळे पापी माणूस मनातून घाबरतो.

आपल्या जीवनातूनही हा शाश्वत धर्म प्रकट करणे म्हणजे निरहंकार होणे. आता तुझा स्वधर्म-शुद्ध करणे हेच आहे.

भगवंताचे वत्सल रूप आल्हाददायक आहे. परंतु त्याचे संहारक रूप उग्र आहे. जो शिव आहे तोच रुद्रही आहे. त्याचीच ही दोन्ही रूपे आहेत.

जोपर्यंत अहंकार जात नाही तोपर्यंत शुद्ध भावना व शरणागती जागत नाही आणि त्यावाचून मोक्षलाभ नाही.

(38) जयद्रथ- कौरवांची बहीण दुःशला हिचा विवाह जयद्रथाबरोबर झाला होता. ∴ तो कौरव पांडवांचा मेहुणा होता. अतिशय पापी होता. द्रौपदीविषयी त्याच्या मनात पापवासना होती. तिच्या रक्षणासाठी पांडवांनी जयद्रथाचा वध करण्याचे ठरवले. जयद्रथाचे पिता होते वृद्धक्षत्र. ज्याच्याकडून जयद्रथाचा वध होईल आणि त्याचे मस्तक भूमीवर पडेल त्याचाही मृत्यु होईल असा त्याला वर होता. तेव्हा अर्जुनाने त्याच्यावर बाण मारून त्याचे मस्तक त्याच्याच पित्याच्या मांडीवर पडेल अशा रीतीने त्याचा वध केला. आपल्या

www.madhaveeraghuveer.com

*Notes*

| 2011 | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| MAY | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

मांडीवर मुलाचे मस्तक पडलेले पाहून वृद्धक्षत्र गोंधळले व उठून उभे राहिले. तेव्हा तात्काळ त्यांचा मृत्यु झाला.

हा सूर्य हा जयद्रथ- सूर्यास्तापूर्वी त्याचा वध होईल तेव्हा क्षणभर श्रीकृष्णाने सूर्याला झाकले आणि बेसावध असलेल्या जयद्रथाचा अर्जुनाने वध केला.

(35) केशव - क- ब्रह्मा, ईश-महेश्वर, व-विष्णु
किरीटी - अर्जुनाच्या पराक्रमाचा गौरव करण्यासाठी इंद्राने त्याला सुवर्णाचा मुगुट दिला होता. तो नित्य मस्तकावर धारण करत असे. ∴ किरीटी.
वेपमान - थरथर कापत असणारा. भगवंतांचे काळ-स्वरूप पाहून अर्जुन कंपित झाला. समुद्राच्या लाटा उसळू लागल्या, प्रचंड वृक्ष उन्मळून पडू लागले. विजांचा कडकडाट झाला, धरणीकंप झाला किंवा उल्कापात झाला तर सामर्थ्य तुटके पडते.

Rightly said
(36) स्थाने - योग्य आहे. अर्जुन भगवंतांच्या रूपाला वारंवार नमस्कार करता झाला. त्याची भीती आहे ती विस्मयातून उमटली आहे. तो स्वभावतः भित्रा नाही. तो केवळ भ्यायलाच असता तर सद्गदित कंठाने बोलू शकला नसता. इथे तो भ्यायला असला तरी भगवंताची स्तुती करत आहे. ही स्तुती अत्यंत शरणागत भावाने आणि अंतःकरणापासून आहे त्यामुळे आपल्या-वरही कोणतेही संकट आले आपण गोंधळून गेलो असलो

Notes

SUNDAY 29

*Democracy Day (NG) (except Edo State)*

| W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | JUN |

www.madhaveelaghuveer.com

8.00 मार्ग सापडत नाही असे वाटले तर हे २० श्लोक
मनापासून म्हणावेत म्हणजे खरोखर दिवा लागावा
9.00 तसा मार्ग दिसतो. आणि समस्येचे निराकरण होते.

10.00 (३७) सत आणि असत यांच्या पलीकडचे अक्षर ते
आपणच आहात. त्यामुळे ब्रह्मदेवाचाही आदिकर्ता
11.00 असणाऱ्या, सर्वाहून श्रेष्ठ असणाऱ्या आपल्याला ते
का बरे नमस्कार करणार नाहीत? निश्चितच करतील.
12.00 या श्लोकात भगवंतासाठी ६ संबोधने वापरली आहेत.
महात्मन, गरीयसे, आदिकर्त्रे, अनंत, देवेश, जगन्निवास.
1.00 ब्रह्मदेव म्हणजे भगवंताचा आदिसंकल्प आहे.
हा परमात्मा अनंत आहे, देवांचाही देव आहे. तो
2.00 जगतात निवास करणारा आहे.
परमात्म्याने सृष्टी निर्माण केली व त्याने
3.00 तिच्यात प्रवेश केला. — ईशावास्यमिदम् सर्वम्।

4.00 (३८) परमात्मा हे आदितत्त्व आहे. समुद्र हा लाटांचा
आश्रय आहे. सुवर्ण हे अलंकारांचा आश्रय आहे.
5.00 त्याचप्रमाणे परमात्मा हा या विश्वाचा आश्रय आहे.
एकच वीज पंखा, शेगडी, शीतपेटी, दिवा अशा विविध
6.00 रूपांनी व्यक्त होते. त्याचप्रमाणे परमात्मतत्त्वही विविध
रूपांनी नटलेले आहे. मात्र ही उपमा पूर्णपणे योग्य नाही.
7.00 कारण विद्युतशक्ती ज्ञानशून्य आहे. परमात्मा शक्तिरूप
आहे व ज्ञानरूपही आहे. तो स्वसंवेद्य आहे.

www.madhaveerahuveer.com

*Notes*

| 2011 | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| MAY | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

म्हणून तो वेत्ता ही आहे. वेद्यही आहे. ज्ञाताही तोच व ज्ञेयही तोच. आत्मा व परमात्मा दोन्ही त्याचीच रुपे आहेत. त्याचे ज्ञान झाले की द्वैत मावळते.

संपूर्ण विश्व हा विराट वृक्ष कल्पिला तर वृक्षाचा प्रारंभ बीजातून होतो आणि वृक्ष विकसनाच्या अगदी शेवटी पुन्हा फळात बीज निर्मिती होते. जिथून प्रारंभ झाला तिथेच शेवटही आहे. त्याचप्रमाणे आत्मबीजातून विश्व विकसनास प्रारंभ होतो आणि त्याचा चरम विकास परमात्म बीज निर्मितीत होतो. दोन्ही बीजे समानच पण एक विश्वारंभीचे आणि दुसरे विकसनाच्या अंती निर्माण होणारे!

परम धाम तोच आहे. तो परमात्मा सर्व विश्वात ओतप्रोत भरलेला. सर्व विश्व व्यापणारा तो विभु आहे.

(३९) आपणच वायु, यम, अग्नी, वरुण, चंद्रमा, प्रजापती व त्यांचेही पिता आहात.

वायु - विद्युतलहरी यम - नियमनशक्ती.
अग्नी - उष्णता वरुण - वर्षा देवता
चंद्रमा - मानसदेवता। प्रजापती - संकल्पदेवता
प्रपितामह - मनात प्रजापतीचा जन्म म्हणून पणजोबा.
अर्जुन या सर्वांना पुन्हा पुन्हा हजार वेळा नमस्कार करतो.

www.madhaveeraghuveer.com

*Notes*

| W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | JUN |

गीताव्रती - डॉ. वि. य. कुलकर्णी

मनुष्य सतत सुखाचा आस्वाद घेऊ इच्छितो पण दुःखालाही स्वतःचा विशिष्ट आस्वाद असतो. दुःखानंतरचे सुख अधिक आनंददायक असते.

जीवन प्रतिक्षणी नवा नवा अनुभव देत असते. जीवन रोज नव्याने उमलत असते. नित्य नूतनता आणि विविधता हेच तर सौंदर्याचे लक्षण आहे. वर्षभर केवळ वसंत ऋतूच कसा असेल? ही धरणी सर्वही ऋतूंचे स्वागत करते. ती सर्वही ऋतूत हसते, नाचते, उमलते, सुगंधित होते. आणि म्हणूनच समृद्ध होते. मन उचंबळून येते. शब्द हरवतात परंतु हर्षवेग मात्र आवरता येत नाही. डोळे भरून येतात. ओठ थरथर कापतात कंठ दाटून येतो आणि हात पुन्हा पुन्हा जोडावेसे वाटतात. अर्जुनही तेच करु लागला आणि म्हणू लागला -

भगवंता तुला नमस्कार असो. पुन्हा नमस्कार असो. आणखी पुन्हा नमस्कार असो.

(४०) हजारवेळा नमस्कार असो इतकेच नाही तर पुढून मागून सर्व दिशांनी नमस्कार असो. तू असीम सामर्थ्यशाली आहेस, अतिशय पराक्रमी आहेस तू संपूर्ण जग व्यापले आहेस. तू सर्वरूप आहेस. अशा सर्वव्यापी तुला सगळ्या बाजूंनी नमस्कार असो. निराकारता व साकारता यात विरोध नाही. गुळाची गोडी

Notes

सर्वात्मक, सर्वेश्वर, सर्वरूप, सर्वव्यापी सर्वज्ञानी

Omnipresent, Omniscient, Omnipotent

सर्वव्यापी सर्वज्ञानी सर्वशक्तिमान

| 2011 | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JUN | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

छांदोग्य - अध्याय -७, खंड - २५ - सर्वत्र तोच आहे.



निराकार असली तरी गुणाला आकार आहे. निराकार पाण्यात संपूर्ण पाणीच असलेले बर्फाचे डोंगर उभे असतात. तशीच ही सगुण साकार सृष्टी निराकाराने दडआहे

(४१) भगवंतांचा अलौकिक महिमा न जाणल्यामुळे अर्जुनाने प्रेमापोटी अनेक प्रमाद केले. तो कृष्णाला बरोबरीचा, मित्रच समजत होता म्हणून तो सलगीने हे कृष्णा, हे मित्रा, हे यादवा असे हाका मारत होता.

(४२) इकडे तिकडे फिरताना, झोपताना, एका आसनावर बसून किंवा भोजनप्रसंगी, एकटे असताना किंवा मित्रांच्या समोर मी थट्टामस्करी करून बोललो क्वचित अपमानही केला. आता मला माझ्या वागण्याचा पश्चात्ताप होत आहे. या अपराधाबद्दल मी तुमची क्षमा मागतो. तू अप्रमेय आहेस. तुझा महिमा अगाध आहे. क्षमा करावी.

असेच नेहमी घडते. परमात्मा अवतार घेतो त्यावेळी त्याचा महिमा जाणवत नाही. विभूतींचे विभूतीपण सर्वांना जाणवत नाही. शिवाजी महाराजांचे अलौकिकत्व त्यांच्या राण्यांनाही ओळखता आले नाही.

तुकाराम महाराज, ज्ञानेश्वर महाराज, सॉक्रेटिस यांचे महत्त्व त्यांच्या समकालीनांना समजलेच नाही.

नारद भक्तीसूत्रात म्हटले आहे. महात्मे थोडे असतात ओळखू येत नाहीत परंतु ओळखू आले आणि भाग्याने सहवास लाभला तर मात्र अमोघ असतात.

www.madhaveeraghuveer.com

*Notes*

| F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | JUL |

श्रीकृष्ण महात्मा आहे हे अर्जुनाला जाणवले होते परंतु ते पूर्णावतार आहेत याची त्याला जाणीव नव्हती. या दर्शनानंतर हे व्यक्तीमत्व आपल्या कवेत सामावणारे नाही असे त्याला वाटले. आपण अजाणता त्याच्याशी सलगीने वागलो. दंगामस्ती केली. पोरकटपणे अपमानकारक बोललो. ते सर्व त्याने सहन केले याचे त्याला वाईट वाटले व त्याने मनापासून क्षमा मागितली.

(४३) आपण या चराचराचे पिता आहात, श्रेष्ठतम गुरु आहात. तिन्ही लोकात आपल्यासारखा कुणी नाही तर आपल्याहून अधिक कोण असणार?

तुजसी न जोडी तुज कोण जोडी?

कारण आपल्या प्रभावाला दुसरी उपमाच नाही.

(४४) म्हणून मी हा देह आपल्या चरणांवर घालून लोटांगण घालत आहे. प्रणिपात करत आहे. आपण स्तुती करण्यास योग्य आहात. पुत्राचे अपराध पिता, मित्राचे अपराध मित्र आणि प्रिय पत्नीचे अपराध पती ज्याप्रमाणे सहन करतो त्याचप्रमाणे आपण माझे अपराध सहन करण्यास योग्य आहात. म्हणजे आपण माझे अनंत अपराध पोटात घालावेत. या श्लोकाला मागच्या ४२ व्या श्लोकाचा संदर्भ आहे. त्याच क्रमाने ही नाती या श्लोकात येतात.

Notes
साष्टांग नमस्कार हा मोठा चमत्कार घडवतो।

| 2011 | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JUN | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

www.madhaveeradhuveer.com

<u>अवहासार्थम्</u> - विनोदाने - लहान मुलगा वडीलांच्या मांडीवर बसून त्यांच्या दाढी मिशा ओढतो तरी सुध्दा वडीलांना राग येत नाही. ते हसत हसत सहन करतात.

<u>असत्कृत:</u> - अपमानित केलेला - मित्रामित्रांमध्ये हास्य-विनोद सुरु असताना एखाद्याने दुसऱ्याची चेष्टा केली किंवा काही खुपेल असे बोलला तरी मित्र या नात्याने तो सहन करतो.

<u>विहारशय्यासनभोजनेषु</u> - पती पत्नी नात्यामध्ये दुरावा उरत नाही. त्यांच्या नित्य एकत्र सहवासामुळे क्वचित पत्नी पतीला उद्देशून सहज काही बोलली तरी पती तिचे ते बोलणे मनावर घेत नाही. तिला क्षमा करतो.

अशा या चढत्या क्रमाने येणाऱ्या पायऱ्या आहेत. त्याचप्रमाणे आपण मला क्षमा करावीत.

(४५) आपले हे विराट स्वरुप पूर्वी कधीही न पाहिलेले असे आहे. त्यामुळे एका बाजूने हर्षही होत आहे तर दुसऱ्या बाजूने भीतीही वाटत आहे. तेव्हा, देवा, जगन्निवासा, प्रसन्न व्हा. आणि आपले चतुर्भुज रुप दाखवा.

सागराच्या पाण्याचे सौंदर्य. हेलकाव्यामुळे भीती वाटते. उंच दरीतून हिरव्या रंगाच्या छटा पाहताना डोळे फिरतात. पिवळ्याजर्द नागाचा रेशमी रंग पाहून भीतीने काटा येतो.

जे सौंदर्य एकाच वेळेस हर्ष आणि भीती निर्माण करते त्या सौंदर्याला दिव्य असे म्हणतात.

तप्त कांचन किंवा मध्यान्हीचा सूर्य सुंदर खरा पण डोळे मिटायला लावतो.

Notes

SUNDAY 5

| F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | JUL |

www.madhaveeraghuveer.com

(४६) देवा मी आपल्याला पहिल्यासारखेच पाहू इच्छितो. मस्तकावर किरीट, एका हातात गदा, दुसऱ्या हातात चक्र (दुसऱ्या दोन हातांनी लगाम धरलेले) असे आपले चतुर्भुज रूप मला दाखवा. आपण मला तसेच दर्शन द्या. जीवनाच्या विलय करणारी विराट एकता कितीही सत्य असली तरी ती मनाला व्यथित करणारी व्याकुळ करणारी भयभीत करणारीच आहे. म्हणून त्याने पुन्हा हरिरूपाचा आग्रह धरला आणि भगवंतांनी त्याची विनंती मान्य केली.

(४७) न दृष्टपूर्वम् - दुसऱ्या कुणीही याआधी न पाहिलेले. खरं तर अर्जुनाच्या पूर्वी यशोदामातेला कृष्णाच्या मुखात ब्रह्मांडदर्शन झाले होते. याशिवाय जेव्हां दुर्योधन कृष्णाला पकडण्याची इच्छा करीत त्याच्यावर चालून गेला, तेव्हा भगवंतांनी विराट रूप धारण केले ते अक्राळविक्राळ रूप द्रोणाचार्य, भीष्म, विदुर, संजय व तपोधन ऋषी यांना पहाता आले. इतरांनी मात्र आपले नेत्र मिटून घेतले. या प्रसंगी देवांचे नगारे वाजू लागले. व (कौरव राजसभेतील जनांना विश्वरूपदर्शन घडले) पुष्पवृष्टी होऊ लागली. तेव्हा अंध धृतराष्ट्राने भगवंतांना पहाण्याची इच्छा व्यक्त केली. तेव्हा धृतराष्ट्राला वासुदेवाकडून (तेवढ्या काळापुरती) दृष्टी प्राप्त झाली. त्याचप्रमाणे उत्तंक मुनी यांनाही विश्वरूपदर्शन घडले.

www.madhaveeradhye.com

Notes

| 2011 | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JUN | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

युद्धानंतर युधिष्ठिराला राज्याभिषेक झाला. नंतर भगवान श्रीकृष्ण द्वारकेला जायला निघाले. तेव्हा मरुभूमीवर त्यांनी मुनिश्रेष्ठ उत्तंकांचे दर्शन घेतले. महर्षी उत्तंकांनी श्रीकृष्णाकडून उत्तम अध्यात्मतत्त्वाचे निवेदन ऐकण्याची इच्छा प्रगट केली. ते ऐकल्यानंतर विश्वरूप पहाण्याची इच्छा प्रगट केली. भगवंतांनी संतुष्ट होऊन उत्तंकाला सनातन वैष्णव धर्माचे स्वरूपाचे दर्शन घडवले व उत्तंक मुनींनी वर मागितला की या मरुभूमीत पाण्याचे दुर्भिक्ष आहे तरी मला ते यथेष्ट जल प्राप्त व्हावे. तथास्तु! उत्तंक हे थोर महर्षी होते. पण अर्जुनाप्रमाणे याना सम्यग्दर्शन घडले नाही.

(४८) भगवंत म्हणतात - तुला ही जी गोष्ट प्राप्त झाली आहे तिचा आनंद न मानता तू भिऊन काय बोलतो आहेस तेच मला कळत नाही. सर्व अन्य साधने व्यर्थ आहेत. वेदांच्या व यज्ञांच्या अध्ययनाने, दानाने, कर्मांनी किंवा उग्रतपांनीही हे रूप पहाणे शक्य नाही. वेद - सत्पात्र आचार्यांद्वारा अंग उपांगासहित वेद पचविणे. यज्ञ - समग्र क्रियांसंबंधी सांगोपांग ज्ञान! दान - स्वतःच्या कष्टातून प्राप्त केलेली धनसंपत्ती, अन्न, जल, विद्या, भूमी, गाय इ. चे प्रसन्न हृदयाने आणि प्रत्युपकाराची इच्छा न ठेवता केलेले दान हे खरे दान होय. क्रिया - श्रौत, स्मार्त यज्ञादिंचे अनुष्ठान वर्ण-आश्रम-धर्म पालनाची शास्त्रविहित कर्मे.

Notes
तपस्या - व्रत, कठोर नियम, मन-इंद्रियांचे दमन. शारीरिक, मानसिक क्लेश सहन करणे.

www.madhaveeraghuveer.com

(४२) विश्वरूपाचा उपसंहार - भगवंतांनी आपले विक्राळ रूप आवरते घेतले. आणि पुन्हा आपले शंखचक्रगदाधारी रूप दाखवण्यासाठी सज्ज झाले. परंतु जाता जाता अर्जुनाला आपण निमित्तमात्र आहोत हे कळले.

परी नेणसीच गा बढिया। काय कोपो आता धनंजया।
अंग सोडूनि छाया। आलिंगितोसी मा॥ ११.६२८

असे भगवंत अर्जुनाला म्हणतात.

हे विश्वरूप जरी भयंकर, अवाढव्य असले तरी हेच खरे आहे असा तू पक्का निश्चय कर.

वि. य. कुलकर्णी - इतरांनाही काही प्रमाणात हे विश्वरूप दर्शन घडले होते परंतु अशा प्रकारचे नाही. कारण साक्षात्काराचाही सोपान असतो. अनुभव आला तरी आपण पोहोचलो अशी कोणीही समजूत करून घेऊ नये. नामदेव महाराजांना लहानपणापासून देवदर्शन घडत होते तरीही ते कच्चे मडके ठरले. साक्षात्कारी असूनही कच्चाच राहिला.

सिद्धी म्हणजे वेश पालटून आलेले कामक्रोधच!

हिमालय पाहिला तरी त्याचे समग्र दर्शन घेतले असे म्हणता येत नाही. हिमालयाचे एखादे शिखर चढून गेलो म्हणजे तो जिंकला असे नाही. हिमालय अगदी सगळा पाहिला तरी त्याचे प्रहराप्रहराला बदलणारे, ऋतुचक्राप्रमाणे नवे नवे रूप घेणारे समग्र दर्शन मी घेतले असे कोणाला तरी म्हणता येईल का?

Notes

| 2011 | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JUN | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

## संजयचे निवेदन -

विश्वरूपी वस्त्राची घडी उलगडून दाखवली. अर्जुनाने ते वस्त्र लांबी-रुंदी, रंग-पोत नीट पाहिला तेव्हा अर्जुनाकडून हे वस्त्र घेतले जाण्याचा संभव नाही हे ओळखून देवांनी आपल्या विश्वरूप वस्त्राची सगुण कृष्णमूर्तिरूप घडी केली. ते विश्वरूपाने वाढलेले कृष्णरूप पुन्हा शांत सगुण सुंदर झाले.

त्यानंतर अर्जुनाला पुन्हा कुरुक्षेत्र व सैन्य दिसू लागले. एखाद्या हरवलेल्या लहान मुलाला त्याची आई पुन्हा भेटल्यावर होतो तसा आनंद अर्जुनाला झाला.

अर्जुनाला पुन्हा भगवंतांचे चतुर्भुज रूप पाहून मनस्वी आनंद झाला. इथे त्रिष्टुप छंद बदलून पुन्हा अनुष्टुप छंद सुरू झाला आहे. जणू काही हे विराट विश्वरूप लहानशा अनुष्टुप छंदात मावणार नाही म्हणून ५५ पैकी ३२ श्लोक त्रिष्टुप छंदात आहेत. अर्जुन पुन्हा एकदा भानावर आला आहे. तो सचेत झाला आहे.

भगवंत म्हणतात - हे माझे जे चतुर्भुज रूप तू पाहिलेस ते पहायला मिळणे अति दुर्लभ आहे. कारण सर्व देव सुद्धा नेहमी या रूपाची दर्शनाची इच्छा करतात. भगवंताचे विश्वरूपदर्शन सुदुर्दर्शम् (पहावयास मिळणे अत्यंत कठीण) आहे. भक्ताने विश्वरूपाचे म्हणजे निर्गुणाचे भान ठेवून सगुणाकडे यावे.

www.madhaveeraghuveer.com

ईश्वरदर्शनासाठी अन्य साधने व्यर्थ आहेत. भगवंत म्हणजे सद्वस्तु आहेत. भौतिकतेतील कोणतीही वस्तु विकत घेता येते आणि विक्रीच्या मूल्यापेक्षा त्या वस्तुची किंमत कमी असते. परंतु भगवंत अमूल्य आहेत. परमात्म्याच्या सृष्टीत देवता या मानवापेक्षा आयुष्य आणि भोग या बाबतीत श्रेष्ठ आहेत. परंतु आध्यात्मिक क्षेत्रात मानव देवतांपेक्षा श्रेष्ठ आहेत. आपल्या शुद्ध क्रियमाण कर्मांद्वारे मानव उन्नत होऊ शकतो. देवतांना मात्र हे स्वातंत्र्य नाही म्हणूनच शास्त्रांनी सुद्धा मानवजन्म अति दुर्लभ मानला आहे.

भगवद्दर्शन कशामुळे होऊ शकते?

तर अनन्यभक्तीने या प्रकारचे चतुर्भुज रूपाचे दर्शन होणे, तत्वत: माझे ज्ञान होणे आणि माझ्यात प्रवेश करणे, म्हणजे माझ्याशी ऐक्य पावणे शक्य आहे.

पावसाच्या वृष्टीसाठी पृथ्वीवाचून दुसरी गती नाही. नदी ज्याप्रमाणे एकनिष्ठ होऊन सागराला मिळते त्याप्रमाणे भक्ताने भगवंताप्रत जायला हवे. काष्ठात अग्नी उत्पन्न झाल्यावर काष्ठ हा शब्द नाहीसा होऊन ते काष्ठच मूर्तिमंत अग्नी बनते. त्याप्रमाणे माझे दर्शन झाल्यावर अहंकाराची येरझार थांबते. आणि तो भक्त माझ्यात ऐक्यभावाने सामावला जातो.

www.madhaveeraghuveer.com

Notes

| 2011 | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JUN | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

मात्र याचा अर्थ कर्मानुष्ठान निष्फळ आहे असा नाही. वेदाध्ययन, तप, यज्ञ, दान हे करायलाच हवे कारण त्याशिवाय चित्तशुद्धी होत नाही. त्यानंतर गुरुमुखातून ज्ञान, वेदवाक्य ऐकणे श्रेयस्कर असते. त्यानंतर भगवत्स्वरूपाविषयी परोक्षज्ञान होते.

श्रवण - परोक्षज्ञान - निदिध्यास - अनन्यभक्ती.

<u>मत्कर्मकृत</u> - प्रत्येक उपासकाने ईश्वरप्रीत्यर्थ कर्मे करावीत. <u>मत्परमः</u> - ईश्वरपरायण होऊन कर्मे केली की ती ईश्वरार्पण होतात. <u>मद्भक्त</u> - मत्परम होण्यासाठी मद्भक्त होणे आवश्यक आहे. आणि महत्वाचे म्हणजे <u>सङ्गवर्जितः</u> - अनन्य भक्तीने बाह्य व अंतःसंग तुटतो. <u>सर्वभूतेषु</u> निर्वैरः - सर्वत्र भगवंताचे दर्शन झाल्यावर वैर कोणाशी धरणार?

अद्वैताची अनुभूती आली की कार्यकारणभाव जातो. अर्थात मानव अविद्येच्या अतीत होतो. तो परब्रह्माचा साक्षात अनुभव घेतो. मानवी जीवनाचा हाच अंतिम पुरुषार्थ आहे.

गीतेचे पंचरत्न - आचार्यांचा आवडता श्लोक.

Notes

SUNDAY 12

*June 12th Commemoration (Lagos State) (NG)*

| F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | JUL |